● शनिवार, दि ५ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ७४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरुल्हता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



शहरातील मराठा बिल्डींग परिसरातील सार्वजनिक डीपी जवळ कचरा टाकण्यात येत असून यामुळे सामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. परिसरातीलच दुकानदारांकडुन हा कचरा या ठिकाणी नेहेमीच टाकण्यात येत असल्याने कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

विधानसभा निवडणुक २०२४; महायुती

## जालना विधानसभेसाठी भाजपचा दावा

### भास्कर दानवे यांच्या उमेदवारीसाठीचा ठराव प्रदेशाध्यक्षांकडे



**जालना । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकीची घोषणा कोणत्याही क्षणी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीतील प्रत्येक पक्ष विधानसभेच्या जागेसाठी आपआपला दावा करत आहे. त्यातच महायुतीत आता जालना विधानसभेसाठी भाजपाने दावा केला आहे. भाजपा हि जागा लढल्यास विजय निश्चित असल्याचा विश्वासही पदाधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला. जालना मतदार संघातून भास्कर दानवे यांना उमेदवारी देण्यात यावी असा ठराव घेत तो ठराव प्रदेशाध्यक्षांकडे पाठविण्यात आला आहे. जालना विधानसभा मतदारसंघातून भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांना भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी देण्यासाठी यांची बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख व प्रमुख पदाधिकारी यांची बैठक झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

या बैठकीत जालना विधानसभा भारतीय जनता पार्टी ला सोडल्यास उमेदवार म्हणून भास्कर दानवे यांचे नाव जाहीर केले. तर जालना विधानसभा मतदार मतदारसंघातून भाजपचा विजय निश्चित असल्याचे भाजपा पदाधिकारी यांनी व्यक्त केले. जालना विधानसभेसाठी भास्कर दानवे यांना उमेदवारी देण्याचा एक मुखी निर्णय भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठराव घेऊन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठविला आहे.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, सिद्धिविनायक मुळे, भागवत बावणे, कपिल दहेकर, बाबासाहेब कोलते, महानगर उपाध्यक्ष धनराज काबलीये, वसंत शिंदे, संध्याताई देठे, शुभांगीताई देशपांडे, अर्जुन गेही, शिवराज जाधव, मनोज बिडकर, सुमित सुरडकर, बबनराव सिरसाठ, सखुबाई पणबिसरे, श्रीकांत शेलगावकर, पांडुरंग पोहेकर, कैलास उबाळे, संजय डोंगरे, बाबुराव भवर, अनिल सरकटे, दिपाली बिन्नीवाले, सिद्धेश्वर हसबे, प्रमोद गंडाळ, प्रभुलाल गोमतीवाले, सुदर्शन काळे, इम्रान सय्यद, डोंगरसिंग साबळे, सोमेश काबलिये, अभिजित अंभोरे, अमन मित्तल, रोहित नलावडे, सुधाकर खरात, रवि कायंदे, निवृत्ती लंके, नागेश अंभोरे, दत्ता जाधव, शारदा काळे, वंदना ढगे, सागर वाहूळकर, करण झाडीवाले यांच्यासह जि.प., पं.स. सदस्य, पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

## मनपा पथविक्रेता समितीवर धनसिंह सुर्यवंशी

**जालना । प्रतिनिधी -** येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत, पथविक्रेत्यांच्या न्याय हक्कासाठी लढा देणारे तसेच हॉकर्स जॉईंट एक्शन कमिटीचे मराठवाडा अध्यक्ष धनसिंह प्रतापसिंह सुर्यवंशी यांची शहर महानगर पालिकेच्या पथविक्रेता समितीवर स्विकृत (नामनिर्देशित) सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. शहर मनपा आयुक्त तथा प्रशासक संतोष एम. खांडेकर यांनी ही निवड केली आहे.

पथविक्रेता अधिनियम २०१४च्या कलम ११(४), १२, १३ अन्वये शहर पथविक्रेता समितीची नुकतीच निवडून पार पडली होती. या निवडणुकीनंतर या समितीवर नामनिर्देशित सदस्य म्हणून श्री सुर्यवंशी यांची निवड झाली आहे. श्री सुर्यवंशी यांनी पथविक्रेत्यांसाठी लढा दिला आहे. भाजीपाला विक्रेते, फळविक्रेता, हातगाडी धारक यांच्या समस्या ह्या शासन-प्रशासन दरबारी मांडण्यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन पान २ वर



युवा आदर्श

**महालक्ष्मी...**

शक्ती पीठे साडेतीन
देव स्थान उर्जावान
कोल्हापूर महालक्ष्मी
प्रथम तिला सन्मान
अशक्यप्राय ते वर्णन
आई मूर्ती आरस्पान
लिंगशैषाघौषहारिणी
ती मूर्ती शोभायमान
सर्वंस्याद्या स्वरुपिनी
शिरी मातृलिंग छान
कितीदा दर्शन घेऊन
पुन: आकर्षीत ध्यान
मूर्ती मागे दगडी सिंह
असूरा करे सावधान
पन्नंगाकितमस्तकाम
शुभचिन्हे देई वरदान
हेमाड पंथी मंदिराचा
परिसर हरविते भान
सुबकसुंदर कलाकृती
वास्तुकला अलिशान
किरणोत्सव अद्वितीय
सूर्यते जाळे प्रकाशमान
देवीचरण स्पर्श अद्भुत
खिळून जाते अवधान
जोगवा अंबाई उदे उदे
गरीबा करावे अन्नदान
अंबा माता दर्शन घेता
दारिद्र्य पावे अंतर्धान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

सहा कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या परतूर नगरपालिकेच्या इमारतीचे भूमिपूजन

## राज्यातील सर्वात विकसीत मतदार संघ करण्याचा उद्देश ठेवून सदैव कार्यरत - आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करून महाराष्ट्र राज्यात सर्वात विकसित मतदार संघ तयार करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून गेली ३५ वर्ष अविरत सातत्याने प्रयत्न करत असल्यामुळे मी राजकारणात आजही खंबीरपणे टिकून उभा आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

परतुर येथे सहा कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणाऱ्या महानगरपालिकेच्या इमारतीच्या भूमिपूजन सोहळा आणि दहा कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या वंदनीय भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहाचे लोकार्पण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर महानगरपालिकेच्या दोन ठिकाणच्या इमारतीतून महानगरपालिकेचा कारभार चालत होता. त्या इमारती खूप जीर्ण झाल्याने पावसाळ्यात गळत होत्या. परतूर शहरातील महानगरपालिकेचा कारभार अत्यंत पारदर्शीपणे आणि सुरळीत चालावा याकरिता भव्य दिव्य इमारत बांधण्याची माझी संकल्पना होती. त्याकरिता मी अनेकदा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना भेटून सहा कोटी रुपये निधी मंजूर करून आणला असून सदरील इमारतीच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने मनाला समाधान वाटत आहे.

गोरगरीब मागासवर्गीय समाजाच्या





मुली शिकल्या पाहिजे त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण घेता आलं पाहिजे याकरिता मी परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा शहरात आणि परतूर शहरात प्रत्येकी दहा कोटी रुपये किमतीचे भव्य वस्तीग्रह निर्माण पान २ वर

## काँग्रेस इच्छुकांच्या सोमवारी मुलाखती

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ७ ऑक्टोबर २०२४



सोमवार रोजी दुपारी दोन ते चार वाजेपर्यंत पाठक मंगल कार्यालय मुक्तेश्वर द्वार जुना जालना येथे पक्ष निरीक्षक खा. डॉ. शोभाताई बच्छाव या घेणार आहेत असे काँग्रेस पक्षाच्या वतीने एका पत्रकाद्वारे कळविले आहे .

जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी इच्छुक म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहे या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती निरीक्षक खासदार डॉक्टर शोभाताई बच्छाव घेणार असून, याप्रसंगी खासदार डॉ. कल्याणराव काळे जालना लोकसभेचे निरीक्षक डॉ. पी .सी. शर्मा जिल्हा प्रभारी माजी आ. नामदेवराव पवार आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे याप्रसंगी काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहावे असे आवाहन जालना जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख , जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख मेहमूद यांनी केले आहे.



# संपादकीय

## तंत्रज्ञानाचा बादशहा

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन. स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोंघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लिखित पिंपरी येथील कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

# परतूर भाजपामध्ये इनकमिंग सुरूच

**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टीमध्ये जोरदार इन्कमिंग सुरू असून परतुर तालुक्यातील लिखित पिंपरी येथील काँग्रेस मधील अनेक कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी बोलताना सांगितले की, मतदार संघाचा समतोल विकास करीत असताना आपण कधीच भेदभाव केला नसल्यामुळे नवनवीन कार्यकर्ते पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात येत असून संजय गांधी निराधार योजने पासून तर लाडकी बहीण पी एम किसान योजना, नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या माध्यमातून मतदार संघातील अनेकांना वैयक्तिक लाभ मिळवून दिला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

पुढे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की कार्यकर्ता हा पक्षाचा प्राण असून आज आलेल्या कार्यकर्त्यांची आपण मनापासून स्वागत करत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले

लिखित पिंपरी येथील बाळू अण्णा सोळंके व अनिल राव सोळंके व अकोली येथील तुका आबा सोळंके यांच्या पुढाकाराने माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत परमेश्वर अशोक भाले कुणाल रावसाहेब सोळंके माजी सरपंच लिखित पिंपरी सोमेश्वर गायके गजानन भिसे ऋषिकेश सोळंके निळकंठ सोळंके गणेश सोळंके मधुकर भाले रामराव माने महादेव सोळंके राहुल सोळंके पवन सोळंके अण्णासाहेब राऊत खंडेश्वर शिंदे राहुल अच्युत सोळंके कचरू शिंदे अशा अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला यावेळी हरिभाऊ चौधरी भरतराव देशमुख रमेशराव कोरडे परमेश्वर सोळंके अशोकराव देशमुख बाबासाहेब चौधरी पांडुरंग मालगन शुभम सोळंके अतुल सोळंके विकासराव कदम बाळासाहेब चौधरी विष्णू दादा मालगन अशोकराव सोळंके रमाकांत सोळंके सोमेश्वर सोळंके रामराव शिंदे अशोक गिरी आसाराम चौधरी प्रतापराव सोळंके प्रभाकर राऊत शिवाजी मालगन प्रकाश भाले परमेश्वर चौधरी सुभाष कोरडे आदींची उपस्थिती होती.



महिना भरापूर्वी काही कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता मात्र, आम्हाला खोटे आश्वासन देत काँग्रेसमध्ये प्रवेश करून घेतला असल्याचा खुलासा करत आम्ही परत घरात वापसी करत असल्याने त्यांनी यावेळी सांगितले.

# नवरात्र उत्सवानिमित्त नऊ शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील १०० शिक्षक समूहातर्फे दरवर्षी नवनवीन शैक्षणिक उपक्रम आयोजित करून सण उत्सव साजरे केले जातात. आणि सामाजिक परिवर्तनासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा प्रयत्न केला जातो. याच अनुषंगाने याही वर्षी नवरात्र उत्सवाचे नऊ शैक्षणिक उपक्रम सामाजिक परिवर्तनासाठी या उपक्रमांतर्गत नऊ दिवसाचे नऊ वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत अशी माहिती शिक्षक समुहाचे कार्याध्यक्ष आर. आर. जोशी, अध्यक्ष राजेभाऊ मगर व संदीप इंगोले यांनी दिली. या उपक्रमाची सविस्तर माहिती अशी की दि. ०३.१०.२०२४ ते १२.१०.२०२४ या कालावधीत नवरात्र उत्सवानिमित्त वेगवेगळ्या शालेय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शैक्षणिक उपक्रमातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला जाणार आहे. यात सुंदर हस्ताक्षर, चित्रकला, रांगोळी, व्यवसायिक शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, निबंध लेखन, प्रश्नमंजुषा व संविधान अमृत महोत्सवानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. या स्पर्धेत विजयी झालेल्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तू, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. आजच्या पहिल्या दिवसाचा पहिला शैक्षणिक उपक्रम जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील जेबीके, नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व ईबीके विद्यालयात मराठी व उर्दू, व इंग्रजी भाषेत सुंदर हस्ताक्षर स्पर्धा संपन्न पार पडल्या.या स्पर्धेतस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिक्षक समूहाचे कार्याध्यक्ष शेख जमीर सर यांच्या आवर्जून उपस्थिती होती. स्पर्धा आयोजनासाठी स्पर्धा संयोजक प्रा. दत्ताजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मुख्याध्यापक नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाब सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराणे, प्रा. डॉ. आनंद जाधव, राजेश शेवाळे, प्रा. केजी जाधव, गणेश संवसाक्रे, डी एस उखर्डे,प्रा. रामदास भांगे, प्रा. अरुण आहेर, गजानन धोटे, वासुदेव क्षीरसागर, प्रा. सुनील बनसोडे, कैलास भुतेकर, रवींद्र मोरे व साबेर शेख यांनी परिश्रम घेतले.



# मनपा पथविक्रेता समितीच्या स्वीकृत सदस्यपदी दिनकर घेवंदे



**जालना । प्रतिनिधी -** येथील शहर महानगरपालिका शहर पथ विक्रेता समितीच्या स्वीकृत सदस्यपदी दिनकर घेवंदे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड मनपाचे आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनी केली आहे.

जालना शहर महानगर पालिका प्रशासन चे वतीने काही दिवसापूर्वी शहर पथविक्रेता समितीची निवडणूक झाली या निवडणुकीत असंघटित कामगार संघाच्या वतीने नामनिर्देशित सदस्य (स्वीकृत सदस्य) पदी दिनकर शंकरराव घेवंदे यांची निवड करण्यात आली ही निवड जालना शहर महानगर पालिका आयुक्त संतोष खांडेकर यांनी ही निवड केली आहे. या निवडीचे पत्र उपायुक्त श्रीमती नंदाताई गायकवाड, सह उपायुक्त केशव कानपुडे, शहरअभियान व्यवस्थापक विजय सांगळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

या निवडीबद्दल शहरातील कामगार, पथविक्रेते, फळ विक्रेते, हातगाडी धारक यांच्यासह सर्व स्तरातील नागरिकांनी श्री घेवंदे यांचे अभिनंदन केले आहे.

## पान १ वरुन

### मनपा पथविक्रेते ...

त्यांची समितीवर निवड करण्यात आली. निवडीबाबतचे प्रमापपत्र मनपाच्या उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, पं. दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाचे शहर अभियान व्यवस्थापक विजय सांगळे यांच्या हस्ते देण्यात आले.

या निवडीबद्दल शहर मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह श्री सुर्यवंशी यांचे मराठा महासंघाचे अरविंद देशमुख, फॅब रनर्स ग्रुपचे अर्जुन जगताप, पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे संदीप खरात, वकिल संघाचे ॲड. लक्ष्मण उढाण, व्यापारी महासंघाचे सचिव ॲड. ईश्वर बिल्होरे, हॉकर्स जॉईंट ॲक्शन कमिटीचे राकेश निर्मळ, इम्रान मिर्झा, लहुजी शक्ती सेनेचे सचिन क्षीरसागर, जय बजरंग फाऊंडेशनचे विपुल राय, रोहीत नलावडे, महाराणा ब्रिगेडचे सुखलालसिंह राजपुत, कालुसिंह राजपुत, दीपक शेळके यांच्यासह शहरातील व्यापारी, नागरिक, पथविक्रेत्यांनी अभिनंदन केले आहे.

### राज्यातील सर्वात ...

होण्याकरिता राज्य सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून आणला असून परतूर शहरातील या आंबा रोडवरील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या वस्तीग्रहाचे लोकार्पण करण्याचे भाग्य मला लाभल ही समाधानकारक बाब असल्याचे प्रतिपादन सुद्धा आमदार लोणीकर यांनी यावेळी केले. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर महानगरपालिकेत आपली सत्ता नसतानाही भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृहाकरता १७ कोटी परतूर शहरातील उड्डाण पुलाकरता ४५ कोटी कोर्टाच्या इमारती करीता २५ कोटी, परतूर शहरातील स्मशान भूमी करीता १५ कोटी. परतूर शहरातील रस्त्या करीता ४०० कोटी निधी राज्य सरकारच्या माध्यमातून आणला असून परतूर महानगर पालिकेवर भाजपा ची सत्ता आल्यास पाचशे कोटी रुपये निधी आणून गल्लो गल्लीत मजबूत टिकाऊ सिमेंट रस्ते बांधणार असल्याचे आवर्जून आमदार लोणीकर या वेळी म्हणाले. या प्रसंगी भाजपा महाराष्ट्राचे प्रदेश सचिव राहुल बबनराव लोणीकर भिक्षु सर्जेराव जाधव शिवाजी पाईकराव प्रजापती शत्रगुण कणसे संपत टकले सुदामराव प्रधान रमेश भापकर भगवानराव मोरे दया काटे प्रवीण सातोणकर संदीप बाहेकर कृष्णा आरगडे प्रकाश चव्हाण इजरान कुरेशी मुज्जू कायमखानी राजेंद्र मुंदडा अमर बगडिया जगदीश झंवर प्रकाश दीक्षित संतोष हिवाळे, विजय यादव, जिजा शिंदे, गजानन लोणीकर, मलिक कुरेशी, शहाजी राक्षे, प्रमोद राठोड, बालाजी सांगुले, बंडू मानवतकर, नरेश कांबळे, डॉक्टर सुधीर आंबेकर, सखाराम कुलकर्णी नामदेव वायाळ, सोपान जैद, सचिन काटे, अर्जुन पाडेवार संजय भालेराव भगवान कांबळे इंद्रजित भालेराव मधुकर मोरे विलास पाडेवार कैलास साळवे संतोष हिवाळे शाहूराव मुंढे संतोष कोळे कृष्णा भदरगे सखाराम कोळे संतोष शेजूळ, तहसीलदार प्रतिभा गोरे, गट विकास अधिकारी तांगडे, महानगरपालिकेचे मुख्याधिकारी उकिरडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता पाटील, कनिष्ठ अभियंता सोनी, सगरुळे आदींची उपस्थिती होती.

# महिला सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री शिंदेच्या विविध योजना - आशाताई विचारे

**परतुर । प्रतिनिधी -** शिवसेना लाडकी बहीण संपर्क अभियान अंतर्गत महिलांचा भव्य मेळावा परतुर येथील इंदिरा मंगल कार्यालयात शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांच्यावतीने आयोजित केला होता या मेळाव्यास शिवसेना उपनेत्या तथा शिवउद्योग सहकार कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्रमुख व परभणी लोकसभा निरीक्षक सुभाष साळुंखे. हे प्रमुख मार्गदर्शक होते. शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांनी आयोजित केलेल्या महिला मेळाव्या प्रसंगी आशाताई विचारे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांना सक्षम करण्याकरिता महाराष्ट्र राज्यात महिलांसाठी विविध योजना राबवत आहेत महिलांना विविध योजनेद्वारे सक्षम करण्याचे काम शिंदे सरकार करत आहे. महिलांची उपस्थिती पाहता परतुर विधानसभा मध्ये मोहन अग्रवाल यांचे पक्ष बांधणीचे काम उत्कृष्ट असून आपण यांचा सकारात्मक अहवाल शिवसेना नेते यांच्याकडे मांडणार आहोत. सुभाष साळुंके यांनी मनोगतात सांगितले की, अग्रवाल यांच्या माध्यमातून परतुर विधानसभा क्षेत्रात विविध विकास कामे झालेले आहेत अग्रवाल यांचा व शिवसेनेचा चाहता वर्ग परतुर विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात दिसत आहे,केलेल्या विकास कामाची पावती यांना आगामी काळामध्ये शिवसेनेच्या माध्यमातून जरूर भेटेल अशी या ठिकाणी ग्वाही दिली.यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल,शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे व ओबीसी जिल्हाध्यक्ष शिवाजी तरवटे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. या मेळाव्यास परतूर विधानसभा क्षेत्रातल्या कानाकोपऱ्यातून महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती या महिला मेळाव्याचे प्रस्ताविक महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख नीताताई घोंगडे यांनी केले तर सूत्रसंचालन शिवसेना शहरप्रमुख दीपक हिवाळे यांनी केले.



याप्रसंगी तालुक्यातील १०० च्यावर लाडक्या बहिणीने शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

सदर महिला मेळावा यशस्वी करण्यासाठी परतूर मंठा शिवसेना जेष्ठ नेते तथा मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे,उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले,परतुर तालुका प्रमुख अमोल सुरूंग, मंठा तालुका प्रमुख उदय बोराडे, ओबीसी व्हीजेएनटी जिल्हाध्यक्ष शिवाजी तरवटे,संघटक विजयकुमार गिरी, शहर प्रमुख दिपक हिवाळे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे,ललिताबाई काळदाते, महिला आघाडी तालुकाप्रमुख नीताताई घोंगडे, सुनिता देशमुख उप तालुका प्रमुख नितीन राठोड,उपतालुकाप्रमुख रंजीत कोल्हे, युवासेना तालुकाप्रमुख अविनाश कापसे, अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष खाजाभाई. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तालुका अध्यक्ष कैलास चव्हाण, युवा सेना उपजिल्हाध्यक्ष योगेश गणगे, युवासेना उप तालुका प्रमुख व्यंकटेश लिपणे,युवासेना शहर प्रमुख प्रणय मोर,शिवसेना दलित आघाडी जिल्हाध्यक्ष रामप्रसाद कसाब, तालुका अध्यक्ष राहुल भदर्गे,विभाग प्रमुख अतुल आर्दड,विभागप्रमुख नागेश चिखले. शिवउद्योग सेना तालुकाध्यक्ष, सरपंच दिनकर शेंडगे, विभाग प्रमुख गोविंद खरात, युवा सेना तालुका प्रमुख दीपक गायकवाड, युवासेना उपतालुकाप्रमुख विजू भाई चव्हाण, उपशहर प्रमुख सोनाली राऊत, गणेश आढे,उपशहर प्रमुख कैलास पुरी, सेवली सर्कल प्रमुख प्रल्हाद शेळके, हसन कादरी, सविताताई ताठे,शाम तळेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या ठिकाणी स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती

अमरावती येथील श्री सोमेश्वर संस्थानाची ५० कोटींची जमीन ९६० रुपयांना विकली !

# जमिनी लाटणाऱ्या तहसिलदारांसह सर्व दोषींना त्वरित अटक करा; 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** अमरावती येथील श्री सोमेश्वर महादेव संस्थानाची ५० कोटी रुपयांची जमीन तहसीलदारांच्या बेकायदेशीर आदेशाने केवळ ९६० रुपयांना विकल्याची अतिशय गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघ या प्रकरणाचा तीव्र शब्दांत निषेध करत आहोत. तसेच या प्रकरणी तातडीने तहसीलदार आणि सर्व संबंधित दोषींची चौकशी करून त्यांना त्वरित अटक करावी, अशी मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघाने केली आहे.

**काय आहे प्रकरण :** श्री सोमेश्वर महादेव संस्थान, अमरावती, ता.जि.अमरावती या धार्मिक संस्थानाच्या मालकीची मौजा-पेठ अमरावती, ता. जि.अमरावती येथे शेत सर्व्हे क्र. ९४, क्षेत्रफळ ४ हेक्टर८५आर. ही शेतजमीन आहे. सदर शेतजमीन हडप करण्याच्या हेतूने सुमन कोठार यांनी तहसीलदार, अमरावती यांचे समक्ष सदर शेतजमीन खरेदी करुन मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता. या प्रकरणात तहसीलदार, अमरावती विजय सुखदेव लोखंडे यांनी कुळ कायद्याच्या तरतुदीचे उल्लघंन करत सदर संस्थानाचा प्राथमिक आक्षेप अर्ज निकाली न काढता या प्रकरणात कोणतेही साक्ष-पुरावे न घेता संस्थानाच्या मालकीची ५० कोटी रुपये मूल्य असलेली जमीन केवळ ९६० रुपयांमध्ये खरेदी करुन देण्याचा बेकायदेशीर आदेश काढला. हा आदेश २६.०९.२०२४ यादिवशी पारित करण्यात आला आणि आदेश पारित केल्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजेच दि.२७.०९.२०२४ यादिवशी अपील कालावधीची मुदत संपण्यापूर्वी खरेदीसुद्धा नोंदवून घेण्यात आली.

तहसीलदार विजय सुखदेव लोखंडे यांनी श्री सोमेश्वर संस्थानाच्या शेतजमीन प्रकरणात अनियमितता करुन बेकायदेशीरपणे संस्थानाच्या शेतजमीनीचे हस्तांतरण करण्याचा प्रयत्न केला आहे. यात संस्थानाची आणि संस्थानाच्या भक्तगणांची घोर फसवणूक झाली आहे. तहसीलदार विजय लोखंडे यांनी तहसीलदार पदाचा गैरवापर करुन या प्रकरणात बेकायदेशीरपणे प्रक्रिया राबवली, कूळकायद्यातील कायदेशीर तरतूदींचे आणि शासकीय परिपत्रकाचे स्पष्टपणे उल्लघंन केले आहे. संस्थानची जमीन हडपण्याकरता स्थानिक बिल्डर लॉबीही सक्रिय असल्याचे दिसून येते. त्यामुळे तहसीलदार विजय सुखदेव लोखंडे यांच्या विरोधात सेवा, शिस्त व नियम व इतर सक्षम कायद्याच्या अंतर्गत विभागीय चौकशी करुन कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'ने केली आहे. 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'चे राज्य कोअर कमिटी पदाधिकारी श्री. अनुप जयस्वाल आणि महासंघाचे जिल्हा निमंत्रक श्री. कैलाश पनपालीया यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी, अमरावती यांच्याकडे याविषयी तक्रार अर्ज सादर केला आहे. तरी तहसिलदार विजय लोखंडे यांसह सर्व दोषींवर कारवाई न केल्यास मंदिर महासंघाच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महासंघाने दिला आहे.

# दरेगाव येथे भास्कर दानवे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण



**जालना । प्रतिनिधी -** मौजे दरेगाव ता. जि. जालना येथे (दि. ०४) माजी केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळा जालना विधानसभा प्रमुख मा. भास्कर दानवे यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी बोलताना रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वात जालना जिल्ह्याला विकासाला नवसंजीवनी लाभली आहे. त्यांच्या माध्यमातून रेल्वे, रस्ते, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा, नियमित पाणीपुरवठा या सर्व प्रश्न सुटून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळत आहे, जालन्यातील आयसीटी कॉलेज, मेडिकल कॉलेज, जालना - जळगाव रेल्वे मार्ग अशी अनेक कामे आजही होत आहेत आणि मा. रावसाहेबदादा दानवे यांच्या नेतृत्वात ही विकासकामे निरंतर होतच राहतील, गावासाठी यापुढेहाय कोणत्याही प्रकारचा निधीं कमी पडू दिला जाणार नाही. निवडणुकीच्या काळात काही खोट्या गोष्टी जनसमान्यात पसरविण्यात आल्या होत्या या पुढे अश्या गोष्टीना भुरळ न पडता गेली २५ वर्ष तुम्ही जी साथ दिली असेच यापुढेही राहू द्या असे प्रतिपादन यावेळी भास्कर दानवे यांनी यावेळी केले.

दरेगाव येथे छ. शिवाजी महाराज पुतळ्यास सभागृह बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष रूपये, अहिल्यादेवी होळकर सभागृह बांधण्यासाठी १० लक्ष रूपये, सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ७ लक्ष रूपये, दलीतवस्तीमध्ये सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी १४ लक्ष रूपये निधी खासदार निधी अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आला होता, तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ५ लक्ष रूपये, दलितवस्ती (जि.प.) योजनेंतर्गत सी.सी. रोड चे बांधकाम करण्यासाठी ३५ लक्ष रूपये, ९५०५ योजनेंतर्गत सिमेंट रोड चे बांधकाम करण्यासाठी १० लक्ष रूपये, धनगर वस्ती योजनेंतर्गत सिमेंट रस्ता व नाली करण्यासाठी ५ लक्ष रूपये निधी मंजूर करण्यात आला होता, यावेळी या सर्व पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. तसेच गावकऱ्यांच्या मागणीनुसार दरेगाव ते पिंपळगाव रस्त्याचे खडीकरण करण्यासाठी ८५१५ योजनेंतर्गत १८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे यावेळी या कामाचे देखील भूमिपूजम भास्कर दानवे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठडे, भागवतबापू बावणे, कपिल दहेकर, संजय डोंगरे, ज्ञानेश्वर देवडे, निवृत्ती लंके, मुकेश चव्हाण, गोवर्धन कोल्हे, कृष्णा गायके, उद्धव ढवळे, सोनाजी तिरुखे, आत्माराम ढवळे, जगुनाना ढवळे, दिलीप तिरुखे, बबन ढवळे, रघु ढवळे, भास्कर ढवळे, ज्ञानदेव आवटे, मुरलीधर आईंदे, मुरलीधर ढवळे, एकनाथ कोरडे, प्रभाकर ढवळे, दगडू जोशी, गणेश खाडेकर यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा व्यापारी आघाडी महानगर जिल्हा संयोजकपदी मनोज पाचफुले

**जालना । प्रतिनिधी -** आतापर्यंतच्या पक्षकार्याची दखल घेऊन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी त्यांची भाजपा व्यापारी आघाडीच्या महानगर जिल्हा संयोजकपदी मनोज पाचफुले यांची फेरनिवड केली आहे.

श्री. दानवे यांच्या हस्ते मनोज पाचफुले यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या नियुक्तीचे भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जिल्हा उपाध्यक्ष भास्कर दानवे, भोकरदनचे आमदार संतोष दानवे, बदनापुरचे आमदार नारायण कुचे, परतुरचे आमदार बबनराव लोणीकर, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, राजेश राऊत, विजय कामड, महानगर अध्यक्ष अशोक पांगारकर, जिल्हा सरचिटणीस सिध्दीविनायक मुळे, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई देठे आदींनी स्वागत करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मनोज पाचफुले हे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचे खंदे समर्थक आणि जवळचे विश्वास कार्यकर्ते आहेत. त्यांच्या आजवरच्या पक्ष कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हा संयोजकपदी फेरनिवड करण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल प्रतिक्रिया देताना मनोज पाचफुले म्हणाले की, रावसाहेब दानवे यांनी सोपवलेली जबाबदारी आपण कामाच्या माध्यमातून सार्थ ठरवून दाखवू आणि आगामी काळात जालना महानगरातील पक्षसंघटन अधिक मजबूत करण्यासाठी अथक परिश्रम घेऊ.

# जिल्हा परिषद शाळेतील मुलांना वह्याचे वाटप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथून जवळच असल्या कुंभारझरी सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य शालिग्राम पाटील म्हस्के यांच्यातर्फे दरवर्षी व यांचे वाटप करण्यात येते. याही वर्षी वह्यांचे वाटप करण्यात आले आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असणारेस शालिग्राम पाटील म्हस्के यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांची मुलांची गरज लक्षात घेता दरवर्षी म्हणजेच बारा वर्षांपासून ते शाळे जिल्हा परिषद शाळेतील मुलांना व यांचे वाटप करतात., नळ विहीरा,खामखेडा, युवराज बोरखेडी चिंच गावातील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना व यांचे वाटप करतात. यावर्षी ७७० विद्यार्थ्यांना ४६२० वह्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यांच्या या कौतुक कौतुकास्पद कामगिरी चे सर्वत्र कौतुक होत असून सामाजिक कार्य मध्ये मला इंटरेस्ट असून त्यामध्ये त्यांना मदत करण्याची आवड आहे.

# सिद्धार्थ महाविद्यालयात माहिती अधिकार सप्ताह साजरा

**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात दिनांक २८ सप्टेंबर २०२४ ते ४ ऑक्टोबर २०२४ माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ ड, वि.भा. काष्टे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे उप प्राचार्य डॉ.श्याम सर्जे कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांचे प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे माहिती अधिकार प्रमुख प्रो.डॉ. सुनील मेढे यांनी केले. प्रस्ताविकेत त्यांनी माहिती अधिकार कायद्याची अंमलबजावणी व आजपर्यंतची वाटचाल यावर सखोल प्रकाश टाकला. प्रमुख मार्गदर्शक ड,काष्टे यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी केलेले आंदोलने व उपोषण व त्याची फलनिष्पत्ती म्हणून माहिती अधिकार कायद्याची निर्मिती विविध कलमे व त्या अनुषंगाने गुन्हे नोंद याबाबतीत कायदेशीर बाबी उपस्थितांना समजावून सांगितल्या. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांनी महाविद्यालयामध्ये विविध कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने माहितीचा अधिकार मागविण्यात आला असता कशा पद्धतीने तो संबंधिताला द्यायचा याविषयीचे मार्गदर्शन केले.




कार्यक्रम प्रसंगी प्रो. डॉ. विजय पाटील यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ केंद्र सरकारने मराठी, पाली, बंगाली, असामी, प्राकृत, भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करून दिल्याबद्दल केंद्र सरकारचा अभिनंदन ठराव मांडला त्यात उपस्थितांनी टाळ्या वाजवून स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सारिका जाधव यांनी केले तर आभार डॉ. एम.जी मोरे यांनी मांडले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बदनापूर विधानसभेसाठी बौद्ध समाजातील उमेदवार द्या

## दिनकर घेवंदे यांची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकीत बदनापूर मतदार संघात बौद्ध समाजाला उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचीत जाती विभागाच्यावतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मुंबई-दादर येथील महाराष्ट्र काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात खासदार तथा महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष श्री चंद्रकांत हांडोरे यांची दिनकर घेवंदे यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचीत जाती विभागाचे वतीने मागणीचे पत्र त्यांना दिले. बदनापूर अंबड हा मतदार संघ राखीव असून ह्या मतदार संघात बौध्द समाज मोठ्या प्रमाणात राहतो म्हणून बदनापूर मतदार संघात आपण पक्षश्रेष्ठी ला बोलून या मतदार संघात बौध्द व जालना जिल्हा येथीलच उमेदवार द्यावा, अशी मागणी जालना अनुसूचीत जाती विभाग शहर जिल्हा अध्यक्ष दिनकर घेवंदे यांनी केली आहे.

# टेंभुर्णी येथील ग्रामदैवत रेणुका माता मंदिर येथे घटाची विधिवत प्रतिष्ठापना



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील ग्रामदैवत नवसाला पावणारी रेणुका माता मंदिर येथे नवरात्र उत्सवानिमित्त गटाची विधिवत पूजा करण्यात आली. घटाची प्रतिष्ठापना करण्यात आली. या घट प्रतिष्ठापना ठमाजी भागवत यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी संस्थांचे अध्यक्ष हाऊसराव देशमुख, संस्थांचे सचिव प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, संस्थांचे उपाध्यक्ष गंगाराम धनवाई, उपाध्यक्ष रामराव जमदाडे, विश्वस्त कमलाबाई देशमुख, सुरेश शिराळे, आशाबाई गुरव, विश्वनाथराव सांगोळे, सुनील देशमुख, आबाराव देशमुख, सरस्वतीबाई देशमुख, लक्ष्मणराव शिंदे, कैलासराव देशमुख, किसनराव देशमुख, सखुबाई कांबळे, रमेश राव जाधव, लक्ष्मणराव खताळ, सचिन जाधव, अविनाश देशमाने, मनोहर घोडके आदींची उपस्थिती होती. दररोज भजनी मंडळ यांचे सुश्राव्य गायन, तसेच दुपारी स्वामी समर्थ भक्त मंडळ शाखा तर्फे, दुपारी एक ते तीन मध्ये दुर्गा सप्तशृंगी चे पठण करण्यात येईल. याचे नियोजन स्वामी समर्थ सेवा केंद्र टेंभुर्णी तर्फे ठेवण्यात आली आहे. तसेच दररोज सकाळी साडेसात वाजता महाआरती व संध्याकाळी महाआरती. नवरात्र उत्सवात नृत्य नियमाने पूजा करण्यात येते. व शक्तिपीठाची आराधना होते.

# शिवसेना दलित आघाडीचा कार्यकर्ता मेळावा

अंबड । प्रतिनिधी - बदनापूर-अंबड मतदार संघ हा राखीव असून संघर्ष योध्दा मनोज जरांगे-पाटील यांनी अंबड-बदनापूर राखीव मतदार संघात लढ म्हटले की, लढतो, असे शिवसेना दलित आघाडीचे तथा भुमिहिन कास्तकरांचे नेते ॲड. भास्करराव मगरे यांनी म्हटले आहे.

अंबड येथे शिवसेना दलित आघाडीचा कार्यकर्ता व दलित आदवासी भुमिहिन कास्तकरांचा मेळावा विश्राम गृहाच्या पटांगणात घेण्यात आला. त्यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधतांना मगरे बोलत होते. यावेळी तालुक्यातील मोठ्या संख्येने दलित आघाडीच्या कार्यकर्त्यांसह भुमिहिन, कास्तकरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. भास्कर मगरे, शिवसेनेचे बाबासाहेब इंगळे, रमेश महाराज वाघ, विलासराव खरात, चंदु बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना ॲड. भास्कर मगरे म्हणाले की, माझे शिवसेनेत २० वर्षात फार मोलाचे योगदान आहे. जिल्ह्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तकरांचे मोठे आंदोलन निर्माण केले. त्या आंदोलनाचा राज्यातील दलित आदीवासी भुमिहिन कास्तकरांना फायदा झाला, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे प्रशासनास आदेश दिले. या आंदोलनातून जिल्ह्यातील बेघर निराधारांचे प्रश्न लक्षात आले म्हणून जालना जिल्हा शिवसंपर्क सामाजिक अभियान गाव,वाडी, तांडा वस्ती मध्ये नेऊन केंद्र शासनाच्या आणि महाराष्ट्र शासनाच्या समाज हिताच्या जनकल्याणकारी योजनांचे विहित नमुन्यातील फॉर्म विना मुल्य भरुन केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांसह दलित आदिवासी व बेरोजगार तरुणांना आर्थिक विकास महामंडळामार्फत व्यवसायासाठी आर्थिक सहाय मिळवून देण्याचे काम शिवसेना दलित आघाडीच्या शिवसंपर्क सामाजिक अभियानातून झाले आहे. हे अभियान गेली १० वर्षांपासून अविरत सुरु आहे. अनेक प्रश्न जनतेचे सत्तेशिवाय सुटू शकत नाही, तरी सुध्दा सन २०२२-२३ मध्ये अंबड शहरातील रमाईनगर, महात्मा फुलेनगर आणि साईनगरच्या रहिवाशांना नगर परिषद आणि तहसिल अंबड यांनी संयुक्त नोटीसमधून संयुक्त कारवाई करुन घरांसाठी झालेले अतिक्रमण जमीनीदोस्त करण्याचे ठरले. तेंव्हा दिलेल्या ४०० नोटीसीला उत्तर मी स्वतः विनामुल्य देवून तिन्ही वस्त्या मी वाचविण्याचे फार मोठे काम केले आहे, असे अनेक प्रश्न मी जालना जिल्ह्यात सोडविले असल्याचे मगरे यांनी सांगितले.



संघर्ष योध्दा तथा मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांचे मराठा आरक्षण देशात गाजत आहे. मात्र राज्य सरकार म्हणावे तशी आंदोलाची दखल घेत नाही आणि म्हणून मनोज जरांगे-पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत २८८ उमेदवार उभे केल्यास अंबड-बदनापूर राखीव मतदार संघात लढण्यास सांगितले तर मी नक्कीच ही निवडणूक लढेन, असेही शेवटी दलित आदिवासी नेते ॲड. भास्कर मगरे यांनी भावना व्यक्त केली.

## उमेद संघटनेचे विविध मागण्यांसाठी

# काम बंद आंदोलन

**जालना -** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या वतीने प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येत आहे आजचा आंदोलनाच्या दुसरा दिवस असून पंचायत समिती कार्यालयासमोर कर्मचारी काम बंद आंदोलन करत आहेत. उमेद अभियान ला ग्राम विकास व पंचायत राज विभागामधील शासनाचा नियमित विभाग म्हणून आस्थापनेला मान्यता देऊन कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी कर्मचारी यांना शासनाच्या समकक्ष पदावर कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून घेणे व इतर मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे.
याविषयी आज दिनांक ४ शुक्रवार रोजी दुपारी तीन वा.सुमारास आंदोलकांनी माध्यमांशी संवाद साधून आपल्या मागण्यांवर विचार करण्याची शासनाकडे आवाहन केले आहे.

# मुलांच्या सुरक्षितेची जबाबदारी समाजाची - वर्षा मोहिते

## शिक्षकांची कार्यशाळा; जालना पोलीस, जिल्हा परीषद आणि रोटरी क्लब यांचा संयुक्त उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** बालक सुरक्षित राहणे ही कुणा एकाची जबाबदारी नाही. तर ती संपुर्ण समाजाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनी येथे केले. शालेय विद्यार्थ्यांसोबत होणारा लैंगिक अत्याचार, त्यातच त्यांच्यासोबत घडणारे गुन्हेच्या अनुषंगाने जालना पोलीस प्रशासन आणि जिल्हा परिषद जालना आणि रोटरी कल्ब जालना यांच्या वतीने आज TEENS Teachers, Educating, Empowering and Nurturing Students अंतर्गत कार्यशाळा आयोजीत करण्यात आली यावेळी त्या बोलत होत्या. सदर कार्यशाळेस ५०० जिल्हा परीषद व खाजगी शाळेच्या शिक्षकांची व जालना जिल्हयातील सर्व पोलीस ठाणेतील पोलीस काका व दिदी उपस्थितीत होते. कार्यशाळेचे उदघाटन श्रीमती वर्षा मोहीते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जालना जिल्हयाचे पोलीस अधिक्षक अजयकुम ार बंसल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी, जालना जिल्हयाच्या शिक्षण अधिकारी दातखीळ, मानसोपचार तज्ञ डॉ. मानसी मोरे तसेच रोटरी कल्बचे



डॉ. सुरेश साबु, रमेश अग्रवाल, अरुण अग्रवाल, दिपक बगाडीया, रवि भक्कड, सुदेश सकलेचा यांची उपस्थिती होती.

पुढे श्रीमती वर्षा मोहीते यांनी पोस्को कायद्याबाबत मार्गदर्शन केले व बालक सुरक्षित राहणे ही कुणा एकाची जबाबदारी नाही. तर ती संपुर्ण सम ाजाची जबाबदारी आहे असे प्रतिपादन करुन शाळा व्यस्थापनास कायदेशीर तरतुदीचे पालन करुन बालकांवर विशेष लक्ष देणे बाबत सुचना दिल्या. तसेच मा जिल्हा पोलीस अधिक्षक श्री अजयकुम ार बंसल यांनी कार्यशाळेस उपस्थितीत असलेल्या शिक्षकांना संबोधीत करताना सांगीतले की, सदर कार्यशाळाचा उद्देश हा बालकांविरुध्द होणारे लैंगिक अत्याचार, सायबर गुन्हयाचे बळी पडु नये याकरीता शाळेत बालकांबरोबर जास्त वेळ राहणारे शिक्षक यांच्या सहकार्यातुन सदर गुन्हयांना प्रतिबंध करणे आहे.

त्यानंतर मार्गदर्शन करतांना मा. अपर पोलीस अधिक्षक श्री आयुष नोपाणी यांनी बालकांविरुध्द लैंगिक अत्याचार गुन्हे हे शिक्षकांच्या सहकार्याने कसे प्रतिबंध करता येईल व विद्यार्थानी स्वसंरक्षण करण्या बाबत मार्गदर्शन केले.

तसेच मानसोपचार तज्ञ डॉ. मानसी मोरे यांनी किशोरवयीन बालकांमध्ये होणारे बद्दल व त्यांची मानसिक स्थिती शास्त्रोक्त पध्दतीने कशी ओळखावी आणि बालक बेकायदेशीर मार्गाला जाणार नाही या बाबत शिक्षकांची काय भुमिका असली पाहीजे याबाबत मार्गदर्शन केले.

यापुर्वी जालना पोलीस प्रशासन आणि जिल्हा परिषद जालना आणि रोटरी कल्ब्र जालना यांच्या वतीने १५ जुलै २०२४ रोजी एक कार्यशाळा अयोजित केली होती. त्यातील म ार्गदर्शनानुसार बालकांविरुध्द होणारे लैंगिक अत्याचार गुन्हे प्रतिबंध करण्यासाठी दामीनी पथक कार्यरत करण्यात आले असुन दामीनी पथक, प्रशिक्षीत शिक्षक, पोलीस काका व पोलीस दीदी सोबत जालना जिल्हयातील वेगवेगळ्या शाळेत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले असुन त्याअंतर्गत एकुण १८० शाळेत जनजागृती कार्यक्रम घेऊन ४३,000 हजारा पेक्षा अधिक विद्यार्थी विद्यार्थीनीना पोस्को कायदा, गुड टच, बॅड टच, रॅगीग व स्वसंरक्षण बाबत मार्गदर्शन केले आहे. यानंतर सातत्याने जिल्हाभरात विविध शाळा व कॉलेजस्तरावर दाम ीनी पथक, प्रशिक्षीत शिक्षक (ढजढ), पोलीस काका व पोलीस दीदी सोबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

तसेच जालना पोलीस दलाच्या वत्तीने जालना पोलीस नावाचे व्हॉटस ॲप चॅनल https://whatsapp.com/ channel/ 0029VafCbT0IN9ire O6bds09 सुरु करण्यात आले असुन पोलीस दलाच्या वत्तीने राबविण्यात येणारे जनजागृती कार्यक्रमांची माहीती नव्याने सुरु करण्यात आलेले चॅनलवर प्रसारीत करण्यात येणार आहे.

# संघर्षाची तयारी असेल तर यश निश्चितच-गीता नाकाडे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात विद्यार्थी संसदेचे उदघाटन



**जालना । प्रतिनिधी -** आव्हाने पेलण्याची क्षमता, परिश्रम, जिद्द, आत्मविश्वास, सातत्य, वेळेचा सदूपयोग यासोबतच संघर्ष करण्याची तयारी असेल तर केवळ स्पर्धा परीक्षाच नव्हे, तर आयुष्याच्या कुठल्याही परीक्षेत तुम्ही उत्तीर्ण होऊ शकता, अशा शब्दात जालन्याच्या शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती गीता नाकाडे यांनी विद्यार्थ्यांना यशाचा पासवर्ड दिला.

शुक्रवारी (दि.४) जालना येथील जवाहरबाग भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात पालक मेळावा व विद्यार्थी संसद उद्धाटन पार पडले. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विद्यार्थी संसदेचे उद्धाटन श्रीमती गीता नाकाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी धम्मदिप संघाचे सचिव कुसूमाकर पंडीत हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून संस्थेचे सदस्य जोहरे, शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार बोटुळे आदिंची उपस्थिती होती. पुढे बोलतांना शिक्षण विस्तार अधिकारी गीता नाकाडे यांनी प्रत्येकाला संधी आहे; मात्र ही संधी हस्तगत करण्यासाठी जिद्द हवी, अभ्यासात सातत्य असावे, मिळालेला प्रत्येक क्षण कसा सत्कारणी लागेल, याचे नियोजन असावे, असे ते म्हणाले. यावेळी कुसूमाकर पंडीत यांनी अभ्यासाला शिस्त लावा, शिस्तीचे पालन करा, नियोजन करून ते प्रत्यक्षात येईल, यासाठी प्रयत्न करा, यश तुमचेच, असा मूलमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

यावेळी संसद सचिव म्हणून फैजल शेख, विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून कु. अक्सा शेख यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. विजया कुलकर्णी यांनी तर आभार सर्जेराव खरात यांनी मानले. या कार्यक्रमास शिक्षक वृंद आर. एस. गाजरे, एच.डी. महाजन, एच.एस. सिरसाठ, व्ही.एन. गायकवाड, रमेश जाधव, हरिदास गाडगे, ज्ञानेश्वर मारकड यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थीनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.